# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयामध्ये जल्लोषात शिवजंयती सोहळा साजरा

महाड

पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबईचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय महाड येथे शिवजयंती सोहळा संपन्न झाला या सोहळयाची सुरूवात शिवज्योत रॅलीने झाली. श्रीमान रायगडापासून श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक त्यापुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयापर्यत बाईक रॅलीचे आयोजन केले होते.

युवा पिढीला शिवकाळात चालवली जाणारी तलवार, दाणपट्टे, लाठीकाठी या मर्दानी खेळाची ओळख करून देण्यासााठी तसेच विद्यार्थ्याना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यानी सहभाग घेतला तसेच शिवजयंती सोहळयानिमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी सायली दळवी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्याच प्रमाणे नरवीर तानाजी मालुसरे यांचे वंशज अंकिता मालुसरे आणि रायबा मालुसरे यांची विशेष उपस्थिती होती. वॉटसप, फेसबुकच्या दुनियेत न रमता युवापिढीने कृतीशिल बनण्याची गरज आहे असे अंकिता मालुसरे यांनी युवापिढीला आव्हान केले तसेच शिवजयंतीचा सोहळा हा सामाजिक दृष्टीकोनातून साजरा केला जावा असे सांगितले. तसेच व्याख्याता सायली दळवी यांनी राजमाता जिजाऊ यांनी पुण्यापासून केलेली स्वराज्याची सुरूवात आणि त्यानंतर वास्तवात आलेले स्वराज्य याची उजळणी करून दिली. स्वराज्य हे तलवारीच्या पातेवर नव्हे तर ते कौतुकाच्या थापेवर राहिले आहे असे उद्‌गार सायली दळवी यांनी काढले. तसेच शिवकाळात उभारण्यात आलेले गडांचे आजच्या तरूणाईत संवर्धन केले पाहिजे असे तरूणांना आवाहन केले आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक फडतरे आणि प्रगती अधावडे या विद्यार्थ्यानी केले.

या कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख प्रा राकेश सोनार महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक श्री. गणेश महाडीक तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.